# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. नांदुरा,जि.बुलढाणा यांचे कार्यालय

कृष्णा नगर,मोताळा रोड,नांदुरा फोन नं-०७२६५-२२११३८,Email-ID-arcs.bud.ndr@gmail.com

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी आदेश

जा.क्र.सनिना/वि-१/म.फु.ग्रा.बि.सह.पत/कलम८८ चौ /६१६ /२०१८
कार्यालय - सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,
तालुका नांदुरा,दिनांक :- ८ / २ /२०१८

**वाचाः** १.मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १,सहकारी संस्था,बुलढाणा यांचे पत्र ११०/१०,दि.८.२.२०१०

**२.** या कार्यालयाचे आदेश क्र सनिनि/विधी/म.फु.ग्रा.पत/वडनेर भो/चौकशी अधिकारी नियुक्ती/कलम ८३/फेर नियुक्ती/२३३८/२०१२,दि.२५.९.२०१

३.चौकशी अधिकारी श्री एस.आय.राजपूत यांनी कलम ८३ अंतर्गत दि.३१.१०.२०१५ राजी सादर केलेला चौकशी अहवाल

४.या कार्यालयाचे चौकशी आदेश क्रजा.क्र सनिना/नियमन/म.फु.ग्रा.बिगर शेती पत.वडनेर भोलजी/कलम ८८/४४७३,२०१५,दि.२९.१२.२०१५

५.ॲड.श्री रामेश्वर बी.खोंड रा.अकोला यांचे १८.१.२०१८ रोजीचे पत्र

---

उपरोक्त वाचा क्र.१ नुसार महात्मा फुले ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,वडनेर भोलजी र.न.१३३६ या संस्थेचे सन १.४.२००९ ते ३१.३.२०१० या कालावधीचे लेखापारीक्षणबाबत विशेष अहवाल प्राप्त झालेला आहे व कलम ८३ व ८८ अंतर्गत ची कारवाई सुचित केली आहे त्यानुसार उपरोक्त वाचा क्रं २ अन्वये श्री एस.आय.राजपूत यांची सदर संस्थेची कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती

उपरोक्त वाचा क्र.३ अन्वये चौकशी अधिकारी श्री एस.आय.राजपूत यांनी उक्त संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करुन या कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे. महात्मा फुले ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,वडनेर भोलजी र.न.१३३६ या पतसंस्थेचे दि.१.४.२००९ ते ३१.१२.२०१० या कालावधीचे लेखापरीक्षणबाबत सादर केलेल्या विशेष अहवालात तसेच चौकशी अधिकारी यांनी सादर केलेले चौकशी अहवालातील संस्थेच्या कामकाजाबाबत गंभिर स्वरुपाचे दोष नमुद केलेले आहेत.तसेच आढळून आलेल्या गंभिर दोषाबाबात संस्थेचे व्यवस्थापक व संचालक मंडळ जबाबदार असल्याचे नमुद केलेले आहे.तसेच संस्थेच्या निधीचा दुरुपयोग करुन मोठे आर्थीक गैरव्यवहारास संस्थेचे व्यवस्थापक व संचालक मंडळ जबाबदार असल्याचे सादर झालेल्या विशेष अहवालात व चौकशी अहवालात नमुद केले आहे.

त्यामुळे संस्था व्यवस्थापक व संचालक मंडळावर तातडीने वैधानिक कारवाई करणे गरजेचे वाटते संस्थेच्या होणा-या आर्थीक नुकसानिस जबाबदार व्यवस्थापक व संचालक पदाधिकारी यांच्यावर नुकसानीची जबाबदारी निश्चित करणे न्यायाचित होईल असे माझी खात्री झाल्यावरुन मी वाचा क्र.४ अन्वये श्री एस.सी.अग्रवाल,सहकार अधिकारी श्रेणी-२,अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,जळगाव जामोद

Scanned by CamScanner

यांची नियुक्ती केलेली होती.मात्र अद्याप चौकशीबाबतचे कामकाज पुर्ण झालेले नाही.तसेच मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था अमरावती यांनी सदर चौकशी वर्ग ३ चे कर्मचारी यांना देता येणार नसल्याचे सांगीतलेनुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## ***आदेश***

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व महाराष्ट्र शासन ,सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मुंबई यांचे आदेश क्र. सीएसएल-१४९३/१९६२/सीआर-४७/१५ सी,दि७.८.१९९३ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी एम.ए.कृपलानी,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,नांदुरा,जि.बुलढाणा .महात्मा फुले ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,वडनेर भोलजी र.न.१३३६ या संस्थेच्या संचालक व व्यवस्थापक मंडळाने केलेल्या आर्थीक गैरव्यवहारात संस्थेचे नुकसान किती झाले व त्याला जबाबदार कोण आहे आणी जबाबदार असणा-या व्यक्तिकडून संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम व्याजासह वसुल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुदीनुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील मुद्यांची चौकशी करण्याचे आदेश देत आहे.या चौकशी साठी एस.सी.अग्रवाल,सहकार अधिकारी श्रेणी-२,अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,जळगाव जामोद यांचे ऐवजी वाचा क्र.५ अन्वये ॲड.श्री रामेश्वर बी.खोंड रा.अकोला यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.सोबतच्या परीशिष्ट अ मधे नमुद केलेल्या व्यवहारात संस्थेला किती आर्थिक नुकसान झाले आहे व झालेले नुकसानीस कोण जबाबदार आहे तसेच ते किमी रकमेस जबाबदार आहे हे निश्चित करुन रकमेच्या वसुली संबंधी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी आवश्यक तो आदेश द्यावेत.प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदर चौकशी अहवाल या आदेशाच्या दिनांकाच्या दोन महीन्यात सादर करावी.

हा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि ८/२ /२०१८ रोजी पारीत करण्यात येत आहे.

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, ता.नांदुरा**

**प्रति,**

१. ॲड.श्री रामेश्वर बी.खोंड रा.अकोला प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरचे आदेश प्राप्त झाल्यावर त्वरीत चौकशीस प्रारंभ करुन आपला अहवाल विहीत मुदतीत या कार्यालयास सादर करावा

१. व्यवस्थापक, महात्मा फुले ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,वडनेर भोलजी र.न.१३३६ ता.नांदुरा यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदर चौकशी वेळेवर पुर्ण होण्याचे दृष्टीने . ॲड.श्री रामेश्वर बी.खोंड रा.अकोला प्राधिकृत चौकशी अधिकारी, यांना चौकशी संदर्भात त्यांचे मागणीप्रमाणे सर्व रेकॉर्ड,अभिलेख व माहीती त्यांना त्वरीत उपलब्ध करुन देण्यातयावीरेकॉर्ड,अभिलेख व माहीती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्यास चौकशी कामात व्यवधान आणल्याबददल संबंधीताविरुध्द गंभीर दखल घेण्यात येईल.

३.अध्यक्ष,सचिव. महात्मा फुले ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,वडनेर भोलजी र.न.१३३६ ता.नांदुरा यांना माहीती करीता

Scanned by CamScanner

४.एस.सी.अग्रवाल,सहकार अधिकारी श्रेणी-२,अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,जळगाव जामोद यांना सुचित करण्यात येते की आपल्या ताब्यात असलेला संस्थेचा रेकॉर्ड ॲड.श्री रामेश्वर बी.खोंड रा.अकोला प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना देण्यात यावा.

**प्रतिलीपी माहीतीकरीता सविनय सादर-**

१.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बुलढाणा

२.मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक,वर्ग-१ सहकारी संस्था,बुलढाणा

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, ता.नांदुरा**

o/c

Scanned by CamScanner